# पोलीस उपअधिक्षक
# अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, चंद्रपुर


हुतात्मा स्मारक मार्ग बंगाली नाका, चंद्रपुर
दुरध्वनी क्रं. ०७१७२-२५०२५१
Email :- acbchandrapur@gmail.com


## प्रेसनोट

**श्री. मिलींद मधुकर वाढई, वय २७ वर्षे, नौकरी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, (कंत्राटी) पंचायत समीती कार्यालय चिमुर ता. चिमुर, जि. चंद्रपुर व श्री. आशिष कुशाब पेंदाम वय २८ वर्षे, धंदा- मिस्त्रीकाम रा.देवरी, ता. चिमुर जि. चंद्रपुर (खाजगी ईसम) यांना लाचेच्या सापळ्यात रंगेहात अटक**

तक्रारकर्ता हे मौजा कळमगाव, पोस्ट आमगाव कोमटी ता. चिमुर, जि. चंद्रपुर येथील रहीवासी असुन रोजमजुरीचे काम करतात. तक्रारकर्ता याचे नावे शबरी आवास योजनेअंतर्गत सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरिता घरकुल मंजुर झाले होते. सदर घरकुल बांधकामाकरीता तक्रारकर्ता यास चार टप्प्यात बांधकामानुसार रक्कम जमा होणार होती. तक्रारकर्ता यास घरकुल योजनेचे दोन किस्त ६५,०००/-रू.जमा झाले असुन तिसरा टप्पा ४५०००/- रू. व चौथ्या टप्प्याचे २०,०००/-रू. असे एकुण जमा करून देण्याकरिता गैरअर्जदार श्री. मिलींद मधुकर वाढई, वय २७ वर्षे, व्यवसाय नौकरी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, (कंत्राटी) पंचायत समीती कार्यालय चिमुर यांनी तक्रारदारास २०,०००/- रू. ची मागणी केल्याचे तक्रार लाप्रवी कार्यालय चंद्रपुर येथे प्राप्त झाली.

प्राप्त तक्रारीवरून दिनांक १९/०६/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी कार्यवाही मध्ये गैरअर्जदार मिलींद मधुकर वाढई, यांनी तक्रारदार यास लाच मागणी करून तडजोडीअंती १०,०००/- रू. स्विकारण्याचे मान्य केल्याचे दिसुन आले. तसेच पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार मिलींद मधुकर वाढई याचे सोबत असलेले त्यांचे मित्र नामे आशिष कुशाब पेंदाम याने गैरअर्जदार मिलींद वाढई यास लाच रक्कम देण्याकरिता तक्रारदारास प्रोत्साहित केले. सापळा कार्यवाहीदरम्यान गैरअर्जदार श्री. मिलींद मधुकर वाढई, वय २७ वर्षे, नौकरी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, (कंत्राटी) पंचायत समीती कार्यालय चिमुर ता. चिमुर जि. चंद्रपुर यांनी स्वत: लाचरक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन गैरअर्जदार मिलींद मधुकर वाढई याचे मित्र आशिष कुशाब पेंदाम यांना ताब्यात घेवुन पुढील तपास कार्य सुरु आहे.

सदरची कार्यवाही ही श्री. राहुल माकणीकर, पोलीस उपायुक्त/पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर, श्री. संजय पुरंदरे, अप्पर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर, तसेच पोलीस उपअधिक्षक, श्रीमती मंजुषा भोसले, ला.प्र.वि.चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात पो.नि.जितेंद्र गुरनुले, पोहवा नरेश नन्नावरे, पो.अ. वैभव गाडगे, राकेश जांभुळकर व चालक पो.अं. सतिश सिडाम ला.प्र.वि. चंद्रपुर यांनी यशस्वी पार पाडली आहे.

यापुढे जनतेला कोणीही लाचखोर अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास लाच-लुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

श्री. राहुल माकणीकर, पोलीस अधिक्षक सा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपुर
श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधिक्षक सा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपुर
पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नागपुर

**LANDLINE NO 0712-2561520**
**TOLL NO 1064**
**Website www.acbmaharashtra gov in**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर फोन क्र. **07172-250251**
श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपुर मो.न. **9322253372**
श्री. जितेन्द्र गुरनुले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपुर मो.न. **8888857184**

(जितेन्द्र गुरनुले)
पोलीस निरीक्षक

Scanned with OKEN Scanner